# ई - पोलीस पत्रिका

दि.१५/०५/२०२३ अनु.क्र.८२

## (अमरावती शहर पोलीसांची२०२३ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबलयुक्त व तणावमुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीसकोठडीत गुन्हे घडू न देणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्यकरू.

## भाग-१

## नेमणुक/पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/१००/२०२३ अमरावती शहर दिनांक १२/०५/२०२३**

### आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद कार्यालयीन शिपाई यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, रजा नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जित रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जित रजा कालावधी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री.हरिकिसन रामकीसन मेटकर, कार्यालयीन शिपाई | पोलीस आयुक्त, कार्यालय अमरावती शहर | दि.१५/०५/२०२३ ते दि.३०/०५/२०२३ पर्यंत एकुण १६ दिवस |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरणे

### शिक्षा

**१. पोआअ/विचौ-१/अंतिम आदेश/पोना-१७७२ दिगंबर चव्हाण/४१५८/२०२३ अमरावती शहर दिनांक ०२/०५/२०२३**

### आदेश

**कसूरदाराचे नाव :-** पोना/१७७२ दिगंबर दामोधर चव्हाण, नेमणूक - पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर

**थोडक्यात कसूर :-**

तुम्ही पोना/१७७२ दिगंबर दामोधर चव्हाण, पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणूकीस असून महिला पोलीस अंमलदार ज्योती खुशालराव कांबळे ब.नं. १५९३ तत्कालीन नेमणूक - पोलीस स्टेशन गाडगेनगर, अमरावती शहर यांनी दिनांक ०३/१२/२०२१ रोजी तुमचे विरुध्द केलेल्या तक्रारी वरुन प्रस्तूत प्रकरणाची **विभागीय चौकशी केली असता सदर चौकशी मध्ये निष्पन्न झाले की**, पो.स्टे.चे डयुटी मदतगार व ठाणेदार हे नको त्या ठिकाणी बारा तासाची डयुटी लावतात वारंवार व हेतूपुरस्पर चेक करुन पाच ते दहा मिनीटासाठी गैरहजेरीची नोंद घेवून बिनपगारी करणे बाबत शिफारस करुन नुकसान करण्याचे हेतूने गोपनिय अहवाल पाठवितात मी प्रामाणिकपणे डयुटी करण्याचा प्रयत्न करते परंतू ठाणेदार व डयुटी मदतगार यांना माझ्या डयुटी विषयी फार आवड दिसून येते बाकी महिला/पुरुष पोलीस अंमलदार यांची डयुटी विषयी त्यांना आवड

दिसून येत नाही मी याबाबत ठाणेदार साहेब व डयुटी मदतगार यांना वारंवार विचारणा केली मलाच हा त्रास का तर डयुटी मदतगार दिगांबर चव्हाण म्हणाले की मला व साहेबांना जे आवश्यक आहे ते वेळेवर देत जा मग तुला डयुटी मध्ये काहीच त्रास होणार नाही असे अचानक म्हणून डयुटी मदतगार यांनी शारिरीक सुखाची मागणी केली १) तू मला एक रात्र काढू दे २) तू माझ्या जवळ येवून माझ उठत नाही ३) तुला डिपार्टमेंट मध्ये धक्का लागू देत नाही फक्त तू मला खूश ठेव या शब्दात ते मला नेहमी बोलत असतात या बाबत पुरावा माझे कडे नसून अप्रत्यक्षरित्या त्यांनी मला शारिरीक सुखाची मागणी केली आहे. मी त्यांचे या अश्लिल बोलण्याकडे लक्ष दिले नाही म्हणून मला नोकरी करतांना दररोज मानसिक त्रास देत असून माझी सहनशक्ती संपलेली आहे. मी माझ्या डयुटीवर मुलाला कधी मारले तर माझेवर बाल अत्याचार संबंधित गुन्हा दाखल करण्याविषयी चर्चा करतात. मी, ठाणेदार व डुयटी मदतगार यांचेवर विनाकारण आरोप करीत नसून माझेकडे डयुटी मदतगार यांचेशी फोन वरील संभाषनाची रिकॉर्डींग उपलब्ध आहे वरीष्ठ पोलीस निरीक्षक कधीही माझी बाजू ऐकूण घेत नाही त्यामुळे माझे कसूरी रिपोर्ट वरीष्ठांकडे पाठविले जातात मी आज पर्यंत भरपूर त्रास सहन केला परंतू आता माझी सहनशक्ती संपलेली आहे. अशाप्रकारे महिला पोलीस अंमलदार ज्योती कांबळे यांनी त्यांचे बयाणात सांगीतले आहे.

तुम्ही पोलीस विभागात अत्यंत जबाबदार पदावर काम करीत असून बेशिस्त व बेजबाबदार पणाचे वर्तण केले आहे. त्यामुळे पोलीस विभागाची प्रतिमा जनमानसात मलीन झाली आहे.

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोना/१७७२ दिगंबर दामोधर चव्हाण, नेमणूक पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतूदी नूसार **देय वार्षीक वेतनवाढ ३ (तीन) वर्षाकरिता (अपरिणामकारक) का रोखण्यांत येवू नये ?** म्हणून कारणे दाखवा नोटीस देण्यांत आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक १६/०२/२०२३ रोजी स्विकारुन त्यावर आपले स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक २५/०४/२०२३ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही परंतु आपणास पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## <u>अंतिम आदेश</u>

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोना/१७७२, दिगंबर चव्हाण नेमणुक पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता** (अपरिणामकारक) शिक्षेबाबतचे अंतीम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने अपिल अर्ज सादर करु शकता.

**२. पोआअ/विचौ-१/सपोउपनि-५१७ बेलसरे + ४/३८४९/२०२३ अमरावती शहर दिनांक २४/०४/२०२३**

**कसुरदाराचे नाव :-**१) सपोउपनि/५१७ मदन गोपाल बेलसरे नेमणूक पोलीस मुख्यालय अमरावती शहर
२) पोना/९०६ प्रविण माल्हा नेमणूक पोलीस मुख्यालय अमरावती शहर
३) पोना/१०२२ जावेद अहमद अब्दूल समिद नेमणूक गुन्हे शाखा, अमरावती शहर
४) पोना/९१७ संजय काळे, नेमणूक पोलीस स्टेशन फ्रेजरपूरा अमरावती शहर

५) पोशि/१३३६ विजय बहादूरे, नेमणूक पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर

वरील पोलीस अंमलदार हे पो.स्टे. फ्रेजरपूरा येथे नेमणूकीस असतांना त्यांचे पो.स्टे. च्या हद्दीत भरत चौधरी व सिराज खॉ हे मोठया प्रमाणावर वरली जूगार व्यवसाय करित असल्याची माहिती प्राप्त झाली व त्यावर गुन्हे शाखे मार्फत वेळोवेळी कार्यवाही करण्यांत आली असून अवैध धंदेवाले हे ठाण्यातील दाखल गुन्हयात फरार होते व त्यांना तात्काळ पकडून मा. पोलीस आयुक्त यांचे समक्ष हजर करण्याचे आदेश पोलीस निरीक्षक सोळंके यांना दिले होते त्यास अनूसरुन पो.नि. सोळंके यांनी संबंधित कर्मचारी यांना दि. १९/१०/२०१५ रोजी लेखी आदेश दिले होते मात्र त्या संदर्भात नमूद कर्मचारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही व दिलेल्या आदेशाकडे जाणीव पूर्वक दूर्लक्ष केले त्यांच्या या बेजबाबदार वर्तणूकीमूळे पो.स्टे. च्या हद्दीत मोठया प्रमाणात अवैध धंदे फोफावले. मा. पोलीस आयुक्त यांना सदर प्रकरणी माहिती मिळालेवरुन दिनांक. २८/१०/२०१५ रोजी भारत चौधरी व त्यांचे हस्तक तसेच अमर गुळदे यांचे विरुध्द गुन्हे नोंद करण्यांत आले. अशाप्रकारे वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाकडे जाणीवपूर्वक अवैध धंदयावर नियंत्रण ठेवता आहे नाही. या त्यांच्या कसुरीप्रकरणी त्यांना या कार्यालयाचे आदेश क्रं. पोआअ/वि.चौ.शाखा/कादानो/सपोउपनि-५१७ मदन +९/९९६७/२०१५ दि. २३/१२/२०१५ अन्वये देय वार्षीक वेतनवाढ (३) तीन वर्षाकरिता पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता रोखण्यांबाबत अंतिम आदेश पारीत करण्यांत आले होते.

सदर आदेशाविरुध्द वरील पोलीस अंमलदार यांनी मा. अपर मुख्य सचिव, गृह विभाग मंत्रालय, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचेकडे अपील अर्ज सादर केला होता सदर अपील अर्जाचे अनुषंगाने मा. गृह विभाग यांनी दि. २३/१२/२०१५ रोजी दिलेली शिक्षा ही कायम ठेवली. वरील पोलीस अंमलदार यांनी उपरोक्त नमुद आदेशाविरुध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर येथे मुळ अर्ज क्र. ३५१/२०२१ दाखल केला त्याअनुषंगाने मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर दिनांक ०८/०२/२०२३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानूसार देय वार्षीक वेतनवाढ एक वर्षाकरिता पुढील वेतन वाढीवर परिणाम न होता रोखण्यांत येत आहे. सदरची शिक्षा सर्व रजा धरुन (नैसर्गिक रजा वगळून) भोगावी लागेल तसेच अर्जदार यांचे दोन वर्षाकरिता वेतनवाढ रोखण्यांत येवू नये आणि जर दोन वर्षाची वेतनवाढ रोखण्यात आली असेल तर त्यांना ती आदेशाची प्रत प्राप्त झाल्यापासून एक महिन्याच्या आत परत करावी असे आदेश निर्गमित केले आहे. त्याअनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

उपरोक्त प्रकरणी कसूरदार अ.क्र. १) सपोउपनि/५१७ मदन गोपाल बेलसरे नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर २) पोना/९०६ प्रविण माल्हा, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर ३) पोना/१०२२ जावेद अहमद अब्दूल समिद, नेमणूक गुन्हे शाखा, अमरावती शहर ४) पोना/९१७ संजय काळे नेमणूक पो.स्टे. फ्रेजरपूरा ५) पोशि/१३३६ विजय बहादूरे, नेमणूक पो.स्टे. राजापेठ, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नूसार **देय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (पुढील वेतनवाढीवर परिणाम न होता)** रोखण्यांत येत आहे असा आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

**३. पोआअ/विचौ-१/निलंबन कालावधी पोना/८८६ सुनिल धोटे/३८४८/२०२३ अमरावती शहर दिनांक २४/०४/२०२३**

**संदर्भ :-.** मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचेकडून प्राप्त मूळ अर्ज क्रं. ०४/२०२२ दि. ०३/०३/२०२३ रोजी दिलेला न्यायनिर्णय.

**विषय :-** निलंबन कालावधी निश्चित होणेबाबत.

००००

पोना/८८६ सुनिल गंगाधर धोटे, नेमणूक - पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर यांचेविरुध्द पो.स्टे. फ्रेजरपूरा येथे नेमणूकीस असतांना अप क्रं. ३०४९/२००२ कलम ७, १२, १३ (१) (ड) लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ अन्वये दि. २०/१०/२००२ अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला असल्याने त्यांना दिनांक २४/१०/२००२ रोजी निलंबीत करण्यांत येवून दिनांक २२/०६/२००४ रोजी निलंबनातून मुक्त करण्यांत आले तसेच पोना/८८६ सुनिल गंगाराम धोटे यांचा निलंबन कालावधी या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ/विचौ-१/निलंबन काळ/पोना-८८६ धोटे/७६४९/ २०१८ दिनांक ११/७/२०१८ अन्वये दिनांक २४/१०/२००२ ते २२/०६/२००४ पावेतोच्या निलंबन कालावधीत निलंबीत केले नसते तर जे वेतन व भत्ते त्यांना मिळाले असते, त्यापैकी ८० टक्के इतके वेतन व भत्ते देण्यात यावेत तसेच दिनांक २४/१०/२००२ ते २२/०६/२००४ पावेतोचा निलंबन कालावधी हा सेवानिवृत्तीचे प्रयोजन सोडून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी कर्तव्यकाळ म्हणून समजण्यात येवू नये असे आदेश निर्गमित करण्यांत आले होते.

पो.ना./८८६ सुनिल धोटे यांनी उपरोक्त नमुद आदेशाविरुध्द मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपूर येथे दाखल केलेल्या मुळ अर्ज क्र. ०४/२०२२ मान्य करुन मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, नागपूर यांनी दिलेल्या न्यायनिर्णयानूसार या कार्यालयाचे दिनांक ११/०७/२०१८ रोजी पारीत केलेले निलंबनकाळ निश्चितीबाबतचे आदेश रद्द करुन निलंबन कालावधी हा कर्तव्यकाळ समजण्यात यावा आणि त्या अनुषंगाने पुढील मिळणारे लाभ अर्जदार याला आदेशाची प्रत मिळाल्यापासून तीन महिन्याच्या आत देण्यात यावे असे आदेश दिलेले आहे त्या अनुषंगाने खालील प्रमाणे आदेश पारीत करण्यांत येत आहे.

## आदेश

पोना/८८६ सुनिल गंगाधर धोटे, नेमणूक - पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर यांचा दिनांक २४/१०/२००२ ते दिनांक २२/०६/२००४ पावेतोचा निलंबन कालावधी म.ना.से. (पदग्रहण अवधी, स्वीयेत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ७२ (३) (४) तरतूदीनूसार "**सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ**" म्हणुन गणण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/वेतन संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**१.पोआअ/आस्था-८/स्थावर मालमत्ता परवानगी/४५९८/२०२३ अमरावती शहर दिनांक १२/०५/२०२३**

# आदेश

पोलीस आयुक्तालय अमरावती शहर आस्थापनेवरील **पोशि/४७३ विजय ज्ञानदेव जवरे नेमणुक जलद प्रतिसाद पथक, अमरवती शहर**हे महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणुक) नियम १९७९ नियम क्रमांक १९ (२) (३) मधील तदतुदीची पुर्तता करीत असल्याने, त्यांना खालील नमुद केलेली स्थावर मालमत्ता (प्लॉट) स्वत:च्या नावाने खरेदीव्दारे संपादीत करण्यांची परवानगी देण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | स्थावर मालमत्ता धारकांचे नाव व पत्ता | भुमी आर्केडस् प्रा.लि.तर्फे संचालक विजय नानकराम तलडा, रा. १६, बाबा हरदासराम सोसायटी, कंवर नगर, अमरावती - ४४४६०६. |
| २ | स्थावर मालमत्तेचे वर्णन | मौजा- म्हसला भाग- २, प्रगणे नांदगावपेठ, ता. जि. अमरावती येथील मधील शेत स.नं.२६/२अ,भोगवाटदार वर्ग-१, एकुण क्षेत्रफळ २ हेक्टर ०२ आर जमीन जी सहाय्यक संचालक नगर रचना, म.न.पा.अमरावती यांनी दि.२१.०३.१९९८ रोजीच्या आदेश क्र.२५८/९९८ अन्वये मंजुर केलेल्या लेआऊट नकाशा प्रमाणे जिल्हा अधिकारी अमरावती यांचे रा.मा.क्र. एनएपी-३४/म्हसला/१६०/ २०११-२०१२ मधील दि.०४/०६/२०२१२ रोजीच्या आदेशान्वये अकृषक करण्यात आली होती त्या अकृषक जमीनीच्या लेआऊट मधील व सहाय्यक संचालक नगर रचना, महानगर पालिका, अमरावती यांचे दि.०१.०२.२०२२ रोजीच्या आदेश क्र. ६९०/२०२२ अन्वये मंजुर एकत्रिकरण व उपविभागणीच्या मंजुर नकाशाप्रमाणे व तसेच उपविभागीय अमरावती यांनी रा. मा. क्र. एन. ए. पी.-३४/म्हसला भाग-२/३५४/२०२१-२०२२ मधील दि.०४.०३.२०२२ रोजीच्या आदेशान्वये दिलेल्या रिवाईज अकृषक परवानगी नुसार मुळ मंजुर लेआऊट नकाशाप्रमाणे लेआऊट प्लॉट उपविभाजीत **लेआऊटप्लॉट क्र.२१-ए ते २५-बी पैकी उपविभाजीत प्लॉट क्र.१, याचे एकुण क्षेत्रफळ १३५.०१ चौरस मिटर (१४५३.२५ चौरस फुट) इतके आहे.** |
| ३ | स्थावर मालमत्ता खरेदी व्दारे संपादित करण्यासाठी ठरविलेली किमंत | **रु.१५,५०,०००/- (एकुण पंधरा लाख पन्नास हजार रुपये फक्त)** |
| ४ | स्थावर मालमत्ता खरेदीव्दारे संपादीत करण्यांस जमविलेल्या रक्कमेचा तपशिल | रु.१२,५०,०००/- होम लोन एच.डी.एफ.सी.बैंक<br>रु.०३,००,०००/- शिल्लक बचत खात्या मधुन<br>--------------------------------<br>रु. १५,५०,०००/- (एकुण पंधरा लाख पन्नास हजार रुपये फक्त) |

**२.पोआअ/आस्था-५/पगार बंद/पोशि ६६२ गोरख पिंगळे/४४७९/२०२३ अमरावती शहर**
**दिनांक ११/०५/२०२३**

**संदर्भ-** पोलीस उपायुक्त परिमंडळ-१, अमरावती शहर यांचे कडील जावक क्र.६१५/२०२२ दि.०४.०४.२०२३

## आदेश

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये कळविणयात येते की, पोशि/६६२ गोरख पिंगळे, नेमणुक पो.स्टे. गाडगे नगर, अमरावती शहर आपण दि.१९.०१.२०२३ पासुन सीक रजेवर असुन इलाजाबाबत कोणतेही कागदपत्रे सादर केले नाहीत. आपणास वरीष्ठांनी कर्तव्यास हजर होण्याबाबत कळविले असता आपण जाणीवपुर्वक हजर झाले नाही. महीण्याचे वर कालावधी होवुन सुध्दा अदयाप पावेतो कर्तव्यावरुन आजारी रजेवर असल्याचे निदर्शनास आले आहे.

तरी प्पोशि/६६२ गोरख पिंगळे, नेमणुक पो.स्टे. गाडगे नगर, अमरावती शहर त्याचे माहे २०२३ पासून वेतन (पगार) पुढील आदेशापर्यत बंद करण्यात येत आहे.

**(किशोर शेंडे)**
प्रशासकीय अधिकारी
पोलीस आयुक्त, अमरावती शहरकरीता

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस